नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/06/2023 (शुक्रवार) सकाळ

## जिवानिशी ठार करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. नरखेड :– फिर्यादी नामे– मजहर मन्नान शेख, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. १६ मोवाड त. नरखेड यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. १०४/२०२० कलम ३०२, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादी तसेच फिर्यादीचा लहान भाऊ **मृतक नामे– अजहर मन्नान शेख, वय २३ वर्ष रा. वार्ड क्र. १६ मोवाड त. नरखेड** हे आरोपी क्र. २) फाईम हकीम शेख, वय ४५ वर्ष, रा. वार्ड नं. १६ मोवाड याच्या दुकानात मोटार सायकल दुरूस्त करण्यासाठी गेले असता मृतक व आरोपी यांच्यामध्ये मोटार सायकल दुरूस्त करण्याच्या कारणावरून वादविवाद होवुन झगडाभांडण झाले तसेच आरोपी क्र. १) नामे– नाजिम नईम शेख, वय २५ वर्ष याने फिर्यादी व फिर्यादीच्या मृतक भावास शिवीगाळ केली होती. त्यांनतर रात्री फिर्यादीचा लहान भाऊ मृतक हा जेवन करून बाहेर फिरण्यास गेला असता काही वेळातच अंतरावर मृतक याचा ओरडण्याचा आवाज आल्याने फिर्यादी व फिर्यादीचा चुलत पुतण्या तेथे गेला असता दुपारी झालेल्या भांडणाच्या कारणावरून आरोपी हे संगनमत करून जीवाने ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या मृतक भावास बैलबंडीच्या लाकडी उभारीणे व हाथबुक्यांनी व लाथांनी मारत होते. फिर्यादीला पाहुन दोघेही आरोपी पळुन गेले. फिर्यादीने मृतकास बेशुदध अवस्थेत उपचाराकरीता सरकारी दवाखाना मोवाड येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. बी. एम. देशमुख पो.स्टे. नरखेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. ०३ देशपांडे मॅडम कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २३/०६/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती देशपांडे मॅडम यांनी वरील दोन्ही आरोपींना कलम ३०२, ३४ भादवि. मध्ये आजिवन कारावास व प्रत्येकी ६०००/– रु. दंड. दंड न भरल्यास प्रत्येकी ०६ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी खुळे सा. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ/१२०४ सुरेद्रसिंग ठाकुर पो.स्टे. नरखेड यांनी मदत केली आहे.

## चोरी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत टेकडी कन्हान येथे दिनांक २१/०६/२०२३ चे २३.३० वा. ते दिनांक २२/०६/२०२३ चे सकाळी ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— रामदास कल्पनाथ गुप्ता, वय ७५ वर्ष, रा. दुर्गा नगर कांद्री यांचे शेतात ६ रूमचे कच्चे मकान आहे. दि. २१/०६/२०२३ चे रात्री ११/०० वा. दरम्यान फिर्यादीचा लहान मुलगा नामे — विजय हा काम करत होता. काम झाल्यानंतर तो मकानाला लॉक न लावता आपल्या राहते घरी परत आला. फिर्यादी हा दि. २२/०६/२०२३ रोजी सकाळी ०६/०० वा. शेतात गेला असता तेव्हा फिर्यादीने बघीतले की कच्च्या मकानाचे दार उघडे होते. फिर्यादी हा आत गेला असता शेतीचे सामान २ मोटार किर्लोस्कर कंपनीचे किंमती अंदाजे १५०००/—रू. थ्रेशर मशीन किंमती अंदाजे २०,०००/— रू. व मोटरचा स्वीच किंमती अंदाजे १०००/— रू. असा एकुण ३६,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणत्यातरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक महेंद्र जळीतकर मो. नं. ९०९६४१६४०४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**